क्र.पोमसं/३१/३९-१/घबांअ- व्याज माफी /१२२/२०१८ मुंबई, दि. २७/०६/२०१८

**संदर्भ :-** शासन निर्णय, वित्त विभाग, १) क्र. एचबीए-१०७६/सी आर-७६५-जीएएन-५ दि. ०५/०२/१९८१ आणि, २) क्र. घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२ विनियम दि. २०/०२/२०१५

**विषय :-** घरबांधणी अग्रीमावरील व्याज क्षमापित करण्याबाबत.

## परिपत्रक

संदर्भाधिन शासन निर्णय दि. २०/०२/२०१५ मधील परिच्छेद ८ (१०) मध्ये नमुद केले आहे की, ' शासन सेवेत असताना अग्रीम धारकाचा मृत्यु झाल्यास, त्याच्या मृत्युच्या दिनांकास शिल्लक असलेल्या व्याजाच्या रकमेची वसुली प्रशासकीय विभागाने सोडून द्यावी. मृत्युच्या दिनांकाला शिल्लक असलेल्या मुद्दलाची पूर्ण रक्कम त्यांच्या मृत्यु- नि- सेवा उपदान / परिभाषीत अंशदायी निवृत्तीवेतन योजनेच्या रकमेतून समायोजित करण्यात यावी. त्यापेक्षा जास्त रक्कम शिल्लक राहिल्यास रू. १.०० लक्ष पर्यंतचीच रक्कम क्षमापित करता येईल व ती रक्कम क्षमापित करण्यास संबंधित प्रशासकीय विभाग सक्षम राहील. त्यानंतरही शासकीय कर्मचा-याकडून घरबांधणी अग्रीम रक्कम वसूल करावयाची शिल्लक राहिल्यास संबंधित कर्मचा-याच्या वारसदाराकडून अथवा वारसदारास अनुकंपा तत्वावर शासन सेवेत नियुक्त केल्यास, त्याच्याकडून शिल्लक रकमेची वसूली करावी. अन्यथा, अशा कर्मचा-याचे घर/ सदनिका शासनाकडे गहाण असल्याने सक्षम प्राधिका-याने सदर घर/ सदनिका लिलाव करून त्या रकमेतून वसुली करावी. त्या अनुषंगाने घटक प्रमुखांच्या आस्थापनेवरील अग्रीम धारकाचा मृत्यु झाल्यानंतर त्याच्या मृत्युच्या दिनांकास शिल्लक असलेल्या व्याजाच्या रकमेची वसुली शासनाने सोडून द्यावी'. त्यानंतर व्याजाची रक्कम क्षमापित करण्याबाबत / सोडून देण्याबाबत या कार्यालयामार्फत शासनास प्रस्ताव सादर करण्यात येतो. अशा प्रस्तावांची तपासणी केली असता, त्यामध्ये ब-याच त्रुटी आढळून येतं आहेत.

२. तरी, अग्रीमधारकाच्या मृत्युच्या दिनांकास शिल्लक असलेल्या व्याजाच्या रकमेची वसुली शासनाने सोडून द्यावी. याकरिता सादर करण्यात येणा-या प्रस्तावात खालील मुद्यांवर घटक प्रमुखांनी माहिती सादर करावी. त्यानंतरच असे परिपूर्ण प्रस्ताव शासनास मंजुरीकरिता सादर करण्यात येतील :-

१) कर्जमंजुरी बाबतच्या आदेशाची प्रत,

२) अग्रीमधारकाच्या मृत्यू प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत,

३) अग्रीमधारकाच्या मृत्युच्या दिनांकास शिल्लक असलेल्या व्याजाच्या परिगणनेची प्रत,

४) शासन निर्णय वित्त विभाग दि. २०/०२/२०१५ मधील परिच्छेद ११ मधील वस्तुस्थितीबाबत नमुद करावे. दिवंगत अग्रीम धारक यांच्यावर म.ना.से. ( शिस्त व अपिल ) नियम १९७९, मधील नियम क्र. ८ नुसार किंवा मुंबई पोलीस ( शिक्षा आणि अपिले ) नियम, १९५६ मधील नियम ३ नुसार शासन सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त / बडतर्फ अथवा सेवेतून काढून टाकले असल्यास त्याबाबत स्पष्ट माहिती प्रस्तावात नमुद करण्यात यावी. अन्यथा, त्याप्रमाणे प्रमाणित करावे.

५) मृत्यूच्या दिनांकाला शिल्लक असलेल्या मुद्दलाची पूर्ण रक्कम त्यांच्या मृत्यु- नि- सेवा उपदान / परिभाषीत अंशदायी निवृत्तीवेतन योजनेच्या रकमेतून समायोजित करण्यात यावी. त्यापेक्षा जास्त रक्कम शिल्लक राहील्यास रू. १.०० लक्ष पर्यंतचीच रक्कम क्षमापित करता येईल. व ती रक्कम क्षमापित करण्यास संबंधित प्रशासकीय विभाग सक्षम राहील. त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील.

(अनुप कुमार सिंह)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचे करिता

This pc/acer-d/all subject folder

**प्रति,**

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, मुंबई

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई/बिनतारी संदेश विभाग, पुणे/लोहमार्ग मुंबई/ रा.रा.पो.बल. मुंबई/गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे/नागरी हक्क संरक्षण,मुंबई

सर्व पोलीस आयुक्त, (रेल्वेसह)

संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक

विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर/विशेष सुरक्षा विभाग, दादर/फोर्सवन मुंबई/ मोटार परिवहन पुणे/रा.रा.पो.बल नागपूर / पुणे

पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर

सर्व पोलीस अधीक्षक (रेल्वेसह)

पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश विभाग, पुणे/पुर्व विभाग नागपूर/गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे/ विशेष कृती दल, नागपूर/अंगुली मुद्रा केंद्र, गु.अ.वि.मुंबई/ नागरी दहशतवाद विरोधी प्रशिक्षण केंद्र मुंबई.

उपसंचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक

सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये/अ.अ.प्र.के, नागपूर

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ ते १६/ राज्य आपत्ती प्रतीसाद दल, नागपूर / धुळे

This pc/acer-d/all subject folder